# तो छोटा मुलगा

हेलन बक्ले, मराठी: अश्विनी बर्वे

एकदा एक छोटा मुलगा शाळेत गेला.

एका सकाळी

बाई म्हणाल्या, “आपण आपण चित्र काढू.”

“मस्त” मुलाने विचार केला.

त्याला सगळ्या प्रकारची चित्र काढायला आवडत.

वाघ आणि सिंहाचे

गाय आणि कोंबडीची पिल्लं

रेल्वे आणि होडीची

त्याने आपला क्रेयॉनचा डबा काढला

आणि चित्र काढू लागला.

पण बाई म्हणाल्या, “थांबा!”

अजून सुरु करण्याची वेळ झाली नाही.

आणि त्या वाट बघत राहिल्या,

जोपर्यंत सगळे तयार झाले नाही.

“आता सुरु करा,” बाई म्हणाल्या.

“आपण फुल काढू या”

“मस्त!” मुलाने विचार केला.

त्याला आवडे सुंदर-सुंदर फुलं काढायला.

आपल्या निळ्या आणि गुलाबी आणि

नारंगी रंगांच्या क्रेयॉननी.

पण बाई म्हणाल्या, ”थांबा!”

“मी सांगते तुम्हांला, ते कसे काढतात ते!”

आणि फुल होते ते लाल, हिरव्या फांदीला लावलेले.

“बघा, असे” बाई म्हणाल्या.

“आता तुम्ही सुरु करू शकतात.”



छोट्या मुलाने बघितले बाईंचे फुल,
मग त्याने बघितले आपले फुल
बाईंच्या फुलापेक्षा सुंदर वाटले त्याला आपले फुल
पण त्याने तसे म्हटले नाही.

फक्त त्याने पान उलटलं,
आणि काढलं तसंच एक फुल जसे होते बाईचे
लाल होते ते, हिरव्या फांदीला लागलेले.

दुसऱ्या दिवशी बाई म्हणाल्या,
"आज आपण बनवू एक वस्तू चिकन मातीपासून"
"मस्तच" मुलाने विचार केला.
आवडे चिकनी कच्ची माती त्याला
तमाम वस्तू बनवू शके तो चिकनी
कच्ची मातीने
साप आणि बर्फाचे पुतळे
हत्ती आणि उंदीर, ट्रक आणि गाड्या
आणि तो मळू आणि तुकडे करू लागला
आपला चिकनी मातीचा गोळा.

पण बाई म्हणाल्या, "थांबा!"
"अजून सुरु करायची वेळ झाली नाही."
आणि वाट पहात राहिली,
जोपर्यंत सगळे तयार झाले नाही.
"आता सुरु करू या," बाई म्हणाल्या.
"आपण बशी करूया."
"मस्तच," मुलाने विचार केला.
"त्याला आवडे बश्या बनवायला.
आणि बनवू लागला तो बश्या
प्रत्येक रंगाची,प्रत्येक डामडौलाची.

पण बाई म्हणाल्या,"थांबा"
"मी दाखवते तुम्हाला कसे बनवतात ते.
आणि दाखवलं तिने कशा बनवतात बश्या
एक खोल बशी.

"बघा अशी," बाई म्हणाल्या.
"आता तुम्ही सुरु करू शकतात.
छोट्या मुलाने बघितली बाईंची बशी
मग बघितले त्याने आपल्या बशी कडे
बाईंच्या बशी पेक्षा अधिक सुंदर वाटली
त्याला आपली बशी.

पण त्याने हे म्हटले नाही,
बस करून टाकला एक गोळा आपल्या
चिकनी कच्चा मातीचा.
आणि बनवली तशीच बशी होती जशी
त्याच्या बाईंची
एक खोल बशी होती ती.

आणि खूप लवकरच
शिकला तो छोटा मुलगा वाट बघायला.
आणि पहायला.
आणि गोष्टी हुबेहूब तशाच, जशा होत्या बाईंच्या
आणि खूप लवकरच
त्याने वस्तू आपल्या तऱ्हेने करणं सोडून दिलं.

मग असं झालं,

तो छोटा मुलगा आणि त्याचा परिवार

राहायला गेले दुसऱ्या कोणत्या घरी

दुसऱ्या कोणत्या शहरात

आणि त्या छोट्या मुलाला

जावं लागलं दुसऱ्या शाळेत

बाई म्हणाल्या,

आज आपण चित्र काढू या.

“मस्तच,” मुलाने विचार केला.

आणि त्याने वाट पाहिली बाईंनी सांगण्याची

की त्या सांगतील काय करायचं ते

पण बाईंनी काहीच सांगितलं नाही.

फक्त वर्गात फेऱ्या मारू लागल्या.

जेव्हा त्या छोट्या मुलाजवळ गेल्या.

त्यांनी विचारलं, “तुला चित्र काढायचं नाही का?”

“काढायचं आहे,” मुलगा म्हणाला.

“आपण काय काढायचं?”

“तू काढ, तेव्हाच तर मला कळेल.”

बाई म्हणाल्या.

“कसे काढू?” मुलाने विचारलं.

“का? जसे तुला काढावे वाटते तसे.” बाई म्हणाल्या.

“आणि कोणत्याही रंगाने?” मुलाने विचारलं.

“कोणत्याही रंगाने” बाई म्हणाल्या.

आणि काढू लागला तो मुलगा,

लाल फुल जे हिरव्या फांदीला लागलं होतं.

समाप्त